# ग्रामगीतेतील स्त्री चित्रण

**एस.आर.चवरे**

बा.दा. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ

## सारांश

*पृथ्वीतलावर स्त्री–पुरुषाचे समान महत्त्व आहे. दोघेही एकमेकांना पूरक आहेत. एकाविना दुसरा/दुसरी अपूर्ण आहे. असे असूनही स्त्रीकडे न्यूनत्वाच्या दृष्टीने पाहिले जाते. अधिकतर पुरुषप्रधान संस्कृतीचे प्राबल्य दिसते. महनियांनी स्त्रीच्या कतृत्वाचे समर्थन केले तर कधी तिला न्यून लेखले जाते. मात्र प्रत्यक्ष सामाजिक जीवनात विविध परंपरांनी तिला जखडले आहे. तिच्याविषयी कित्येकदा ललित व वैचारिक लेखनातून उदात्त चित्रण केलेले असले तरी वास्तव मात्र याहून वेगळे आहे. ग्रामगीतेमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्त्रीला पुरुषापेक्षा अधिक सोशीक व श्रेष्ठ मानलेले आहे. तिच्या कर्तृत्वाचा गौरव केला आहे. त्यासाठी पौराणिक, ऐतिहासिक पुरावे दिले आहेत. व्यक्ती, कुटुंब समाज राष्ट्र असा चढता आलेख अधोरेखित करताना स्त्रीच्या समर्थ नि संपन्न व्यक्तिमत्त्व निर्मितीत शिक्षणाची भूमिका महत्त्वाचे असल्याचे त्यांनी विशद केले आहे. बलवान भारताच्या निर्मितीत स्त्रीचे योगदान उल्लेखनीय ठरु शकेल असा आशावाद राष्ट्रसंत व्यक्त करतात.*

***मुख्य शब्द:*** *मानव समाज, पुरुषप्रधान संस्कृती, स्त्रीजीवन, राष्ट्रसंतांचे तर्कशुद्ध विचार, स्त्रीचे श्रेष्ठत्व व महती, समाजाची पारंपारिक दृष्टी, कालोचित स्त्री शिक्षण, स्त्रीचे कर्तृत्व, राष्ट्रसंतांचा आशावादी दृष्टीकोन.*

## प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधात ग्रामगीतेतील स्त्री चित्रणाचा अभ्यास अपेक्षित आहे. राष्ट्रसंत लिखीत ग्रामगीता हा वैशिष्टय संपन्न आणि मौलिक ग्रंथ आहे. त्यात कालोचित दृष्टीकोनातून राष्ट्रसंतांनी समाजजीवनाच्या विविध पैलूंचे मुक्त चिंतन केलेले आहे. मानवी जीवनाचे त्यांचे गाढ आकलन आहे. माणूस हा समाजातील सर्वात महत्त्वाचा घटक आहे. राष्ट्रसंत स्त्री पुरुष या दोघांचा प्रथम माणूस म्हणून विचार करतात. येथे त्यांच्या स्त्री जीवन चित्रणाचा अभ्यास करताना स्त्रीचे व्यक्तिमत्त्व, तिचे शिक्षण, महत्त्व, कर्तृत्व, सोशीक वृत्ती, संयम यांचा परामर्श अपेक्षीत आहे.

प्राचीन , मध्ययुगीन व आधुनिक कालखंडात विविध ग्रंथांमध्ये स्त्री विश्व अधोरेखित झाले आहे.वर्तमान कालखंडात सामाजिक जीवनातील तिचे स्थान सर्वज्ञात आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामगीतेत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मौलिक विचार व्यापक दृष्टिकोनासह नवी दिशा सूचित करतील असे वाटते.

- स्त्रीकडे पाहण्याचे विविध दृष्टीकोण :
- वर्तमान व्यवस्थेत स्त्रीचे स्थान
- स्त्रीचे कर्तृत्व व भावविश्व
- ग्रामगीतेतील स्त्री चित्रणांतर्गत राष्ट्रसंतप्रणीत स्त्रिशिक्षण व तिचा विकास
- समाजजीवनात स्त्रीचे योगदान
- स्त्रीचे कार्यकौशल्य

समाजात कमी अधिक प्रमाणात स्त्रियांची अर्धी संख्या असते. देशकालपरिस्थितीनुसार तिच्यात बदल संभवत असतात. मानव समाज अनेक जातींच्या चिरफळयांमध्ये विभागला गेला आहे. त्या त्या जातीनुसार स्त्रियांसाठी काही पारंपरिक नियम केलेले दिसतात. त्यावर लक्ष ठेवण्याचे काम जातपंचायत करते. “जात पंचायत ही मुख्यत: स्थानिक पातळीवर वावरते. “भौतिक व्यवहार आणि नैतिक मानदंड या दोहोंवर जाती नियमांचे नियामक आणि दंडात्मक वर्चस्व असते” (डॉ. सुहास पळशीकर, १९९९) कित्येक मागास जाती जमातीमध्ये स्त्रीविषयक नियम जाचक असल्याचे दिसून येते. तसेही दीर्घ काळापासून स्त्रीचे स्थान दुय्यमच राहिलेले आहे. “पिता रक्षती कौमार्ये, भर्ता रक्षाति यौवने, स्थावरी रक्षंति पुत्रा: न स्त्री स्वातंत्र्य मर्हती” ही मनुस्मृतीतील मानसिकता सर्वश्रुतच आहे. म्हणूनच 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धरी' हे केवळ मर्यादित अर्थानेच घ्यावे लागते. समाज व्यवहारात, राजकारणात स्त्रीकडे न्यूनत्वाच्या भावनेनेच पाहिले जाते म्हटल्यास अतिशयोक्ती होवू नये. पाश्चात्त्य राष्ट्रातही स्त्रीला मतदानाचा हक्क बराच उशीरा प्राप्त झाला. त्यासाठी दीर्घकाळ संघर्ष करावा लागला. भारतातही बालविवाह, विधवा विवाह बंदी, सती प्रथा या क्रूर रूढींनी स्त्रीला दीर्घकाळ जखडून टाकले होते. स्त्रियांविषयी प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन काळात विपुल लेखन झालेले आहे. मातृशक्ती म्हणून तिला गौरविले आहे. प्रल्हादाची आई कयाधू, कौसल्या, देवकी, जिजाबाई अशी गौरव परंपरा सांगितली जाते. दुसरीकडे आज हुंडाबळी जात आहेत. स्त्रीवरील अत्याचार थांबता थांबत नाही. कमी अधिक प्रमाणात समाजाच्या सर्व स्तरातील स्त्रिया विविध प्रकारच्या शोषणाच्या बळी आहेत. “कुटुंबात गृहिणीच्या कामाला कोणताही दर्जा प्राप्त नाही. कुटुंबात गृहिणीला अनुत्पादक घटक मानण्यात आले आहे.” (छाया मोहनराव

गडगे, २००६) जागतिक महाशक्ती म्हणून उदयास येऊ पाहणाऱ्या जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीप्रधान, पुरोगामी म्हणवणाऱ्या भारतातील ही वस्तुस्थिती आहे. महाराष्ट्रात दर हजारी ९२९ इतके कमी स्त्रियांचे प्रमाण आहे. अजूनही समाजाच्या मानसिकतेत गतानुगतिकतेचे दर्शन घडते. "सालंकृत कन्यादानाचा दुराग्रह, हुंड्यापायी अडवणूक, कन्याविक्रयाची द्रव्यलोभी वृत्ती यांबरोबरच बालाजरठ विवाहाची तयारी अशा अनेक अमंगल बाबी विवाह व्यवहारात चोर वाटेने येऊन शिरजोरही झाल्या आहेत."(डॉ.सुभाष सावरकर, २००४) मध्यम व उच्च वर्गीय जीवनात याचा प्रत्यय येतो. विशेष म्हणजे याला जातीचे वा धर्माचे अपवाद नाहीत. मुलगी अशिक्षित असो वा सुशिक्षित, ग्रामीण असो वा नागर वधूपित्याला तिच्या विवाहाची चिंता जाळताना दिसते. हुंड्याच्या प्रश्नात स्त्रियांचे गौणत्व दिसते. दुसरीकडे तिच्या यशाचे, कर्तृत्वाचे पवाडे गायिले जातात. "संसारात आई, पत्नी, बहीण, मुलगी म्हणून स्त्रीचे स्थान केंद्रीभूत आहे. तिचा अधिकार फार मोठा. कारण संतांनीही स्वत:कडे माऊलीचे रूप घेतलेले आहे. स्त्री ही दक्ष, कारूणी अशी आहे." (डॉ.उषा माधव देशमुख, २००८) असे म्हणून तिच्यावर कधी स्तुतीसुमने उधळली जातात. आज समाजातल्या सर्व क्षेत्रात स्त्रीने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. त्यामुळे प्रत्येक विकासात तिचाही पुरुषाइतकाच वाटा आहे. याबाबतीत म. जोतीराव फुले आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज या दोघांच्याही विचारात विलक्षण साम्य दिसते. म. फुले स्त्रीला श्रेष्ठ मानतात. "स्त्री व पुरूष या दोघांपैकी असेलच तर श्रेष्ठ कोण? या प्रश्नाचे जोतीरावांचे उत्तर नि:संदिग्ध आहे. त्यांच्यामते स्त्रीच पुरूषांपेक्षा कितीतरी बाबतीत श्रेष्ठ आहे. स्त्रियांच्या तुलनेत पुरूष जास्त दुर्गुणी असतात आणि त्यांच्या दुर्गुणांची झळ स्त्रियांनाच सोसावी लागते." (डॉ.भा.ल.भोळे, १९९०) तर राष्ट्रसंतांच्या मते, स्त्रियांमुळेच कुटुंबाचा, समाजाचा व देशाचा विकास होतो. भारतीय राज्य घटनेने स्त्री पुरूषांना समान दर्जा दिलेला आहे. राष्ट्रसंत त्याही पुढे जाऊन म्हणतात –

**समाजी जो पुरूषासी आदर । तैसाचि महिलासी असावा व्यवहार ।**
**किंबहुना अधिक त्यांचा विचार । झाला पाहिजे समाजी ।। ३०/७८**

ग्रामगीतेतील २० व २१ या दोन अध्यायात अनुक्रमे 'महिलोन्नती' आणि 'वैवाहिक जीवन' या सदरात स्त्री जीवनविषयक सूक्ष्म विवेचन केलेले आहे. त्यात त्यांचा बुद्धिवादि व तर्कशुद्ध दृष्टिकोन स्पष्ट होतो. आपल्या व्यवस्थेवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. कुटुंबात मुलामुलींना सारखी वागणूक दिली जात नाही. मुलीला नेहमी कोंडून ठेवले जाते. मुलाला हुंदडायला परवानगी मिळते. असा हा आपपरभाव स्त्री विकासातला अडसर ठरतो. स्त्रियांची विविध रूपे व्यक्त करताना राष्ट्रसंत लिहितात –

**स्त्रियेसारखी मोहिनी नाही। स्त्रियेसारखी वैरागिणी नाही।**
**स्त्रियेसारखी मुलायम नाही । आणि कठोर रणचंडिका ॥ २०-५३**

खरे तर स्त्रीला योग्य शिक्षणाची, संस्काराची संधी उपलब्ध करून दिली तर तिचा विकास व्हायला वेळ लागणार नाही. राष्ट्रसंतांचे महिलाविषयक विचार कालोचित व विज्ञाननिष्ठ आहेत. स्त्रीला जर शारिरीक प्रशिक्षण दिले तर ती स्वत:चे निर्भयपणे संरक्षण करू शकते आणि इतरांनाही सुरक्षित ठेवण्याची हमी घेते. मात्र याबाबतीत घरातील कर्त्या पुरूषाने पुढाकार घेतला पाहिजे. राष्ट्रसंतांच्या मते, "जेव्हा पुरूष आपल्या कुटुंबातील व्यक्तींना आपल्या सारखेच बनवून घेतो तेव्हा तो तितकाच मोठा होतो."(राष्ट्रसंत तुकडोजी, २००१) प्रस्तुत विधान चिंत्य आहे.

कुटुंबापासून समाज, समाजामुळे राष्ट्र आकारास येत असते. 'बलसागर भारत होवो' असे राष्ट्रसंत म्हणतात तेव्हा स्त्री पुरूष अशा दोघांचा विकास त्यांना अभिप्रेत असतो. "माणसाचे कुटुंब हे एक आकुंचित स्वरूपाचे राष्ट्रच आहे." (राष्ट्रसंत तुकडोजी, २००९) हे राष्ट्रसंतaMcao मत कुटुंबाचे महत्त्व विशद करणारे आहे.

परंपरा व परिवर्तन यांचे राष्ट्रसंतांना गाढ आकलन आहे. राणी दुर्गावती, महाराणी पद्मिनी, झाशीची राणी या विरांगणांचे त्यांच्या शौर्यासह स्मरण करून देतानाच स्त्रीशिवाय संसार अपूर्ण असल्याची ते जाणीव करून देतात. त्याचवेळी अविवेकी विचार तिने करू नये. तिने गृहकृत्याबरोबरच सामाजिक जीवनाचीही जाणीव ठेवावी. परंपरागत भारतीय जीवनदायी संस्कार आणि विज्ञान युगातील संपन्न शैक्षणिक वाटचाल या दोन्हीचे तिने भान ठेवावे असे राष्ट्रसंतांना वाटते. स्त्रीची महती पुरूषांपेक्षा अधिक असल्याचे ते ग्रामगीतेत नि:संदिग्ध शब्दांत सांगतात-

**स्त्रीलाच भक्ती, स्त्रीलाच ज्ञान । तिलाच संयम, शहाणपण ।**

**तिच्यानेच हालती वाटे संपूर्ण । संसारचक्रे ।। २० – ३३**

पूर्वी स्वयंवर पद्धत अस्तित्वात होती. आज मात्र तिचे महत्त्व उरले नसल्याचे राष्ट्रसंत सांगतात. ते विवाहाला एक मंगल संस्कार मानतात. सामूहिक विवाह पद्धतीचा आवर्जून पुरस्कार करतात. लग्नकार्यादि प्रसंगी अनावश्यक खर्च टाळण्यावर ते भर देतात. त्यांच्या समोर कुटुंबहित व राष्ट्रहित आहे. राष्ट्रसंतांचा उक्तीपेक्षा कृतीवर अधिक भर असल्याने त्यांनी कित्येकदा सामूहिक विवाह पार पाडले. विवाहप्रसंगी वधूपक्षालाच अधिक जाच सहन करावा लागतो आणि हे आपल्या व्यवस्थेत परंपरेने चालत आलेले आहे. सामूहिक विवाहामुळे अनावश्यक खर्च आणि खोटे रूसवे फुगवे यांना फाटा बसतो. राष्ट्रसंतप्रणीत विवाह पद्धती 'गुरूदेव विवाह पद्धती' या नावाने ओळखली जाते. ही विवाह पद्धत आदर्शाचा मानदंड आहे. मात्र कटूसत्य तर हे आहे की, लोक क्वचीतच या पद्धतीचा स्वीकार करताना दिसतात.

ग्रामगीता या सर्वसमावेशक ग्रंथात जाणीवनेणीवेचे बहुआयामी दर्शन घडते. स्त्रीपुरूष ऐक्य म्हणजे जनसामान्यांच्या ऐहिक जीवनाचा ऊर्जास्त्रोत आहे. त्यातून कौटुंबिक-सामाजिक स्थैर्य अपेक्षीत आहे. सत्यनिष्ठ, सत्त्वशील, क्रीयाशील, न्यायनिष्ठ, सेवाभावी, संस्कारक्षम व्यक्ती त्यांना अपेक्षीत आहे. स्त्री आणि पुरुष हा भेद नंतरचा आहे. प्रत्येक स्त्रीपुरूष आधी उपरोक्त संपन्न व्यक्ती आहे. असावी. ही राष्ट्रसंतांची आंतरेच्छा आहे. प्रत्येक व्यक्ती आंतर्बाह्य संपन्न, समृद्ध असण्यासाठी त्यांनी जीवन शिक्षणाची अनिवार्यता निवेदिली. शिक्षणाऐवजी जीवन शिक्षण ही संयुक्त संज्ञा ते वापरताना दिसतात. त्याची दिशाही स्पष्ट करतात. "समाजोन्नतीची स्वप्ने पाहणारे द्रष्टे त्यानुरूप परिवर्तनाचा कार्यक्रम देत असतात." (डॉ. श्रीकांत तिडके, २००९) स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी जीवनशिक्षणाबरोबर स्त्रियांच्या परिस्थितीजन्य मेळाव्यातून त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, असेही त्यांना वाटते. राष्ट्रसंतांचा सकारात्मक वैज्ञानिक दृष्टिकोन इहवादी जीवनाला अनुरूप चेतना देणारा आहे. भूत, भविष्य व वर्तमानाचा वेध घेत ते कालोचित विचार मांडताना दिसतात. म्हणून स्त्री शिक्षण, स्त्री स्वातंत्र्य, स्त्री महत्त्व प्रतिपादन करतानाच कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होवू नये असेही त्यांना वाटत राहते. स्त्री कितीही उच्चशिक्षित असली तरी तिला पाककलेसारखी आवश्यक बाब अवगत असली पाहिजे असे ते आवर्जून सांगतात. पक्षाने पंखाच्या बळावर आकाशात भरारी घेतली तरी शेवटी त्याला जमिनीवर परतावे लागते. राष्ट्रसंत म्हणतात –

**असले शिक्षण वाटते साधारण । परी याचे जीवनात अग्रस्थान ।**

**नाहीतरी जगावे जनावरासमान । होईल स्वैंपाक न येता ।**

बालविवाहाला विरोध करतानाच त्यांनी विधवा विवाहाला मान्यता दिलेली आहे. येथेही कोणावर विचार न लादण्याचा ते सल्ला देतात. एखादी विधवा संन्यस्त वृत्तीने जगू इच्छित असेल तर तिच्या इच्छेचा मान राखावा. हा उदात्त विचारही ते सांगून जातात. भारतीय राज्यघटनेने मानवी मूल्य आणि मानवाची प्रतिष्ठा सन्मानित केलेली आहे. जगातल्या कित्येक स्वतंत्र, लोकशाहीप्रधान देशांनीही त्याची भलावण केलेली आहे. राष्ट्रसंत याच विचाराचे पुरस्कर्ते आहेत. ग्रामीण संस्कृतीमध्ये गृहिणीला घरातील सर्व कामे करून शेतीतही राबावे लागते. मात्र शैक्षणिक विश्वात गुणवत्तेच्या बाबतीत कित्येकदा मुलीच आघाडीvar दिसतात. आता तर संरक्षण विभागातील तिन्ही दलात स्त्रीशक्तीचा समावेश होताना दिसतो. राष्ट्रसंतांनी पुरूषापेक्षा स्त्रीला श्रेष्ठ म्हटले असले तरी स्त्रीनेही आपली जबाबदारी व कर्तृत्व यथोचित पार पाडावे असे सांगायलाही ते विसरले नाहीत. शेवटी तर ते असेही सांगून जातात – "मित्र म्हणून समानतेने कार्य करण्यासाठी व चारित्र्य शुद्ध ठेवण्यास मदतगार समजून परस्परांच्या जीवनाचे कल्याण करण्यासाठी दोघांनी एकत्र यावे. दासी म्हणून पायदळी तुडवावे वा राणी म्हणून डोक्यावर घ्यावे, यासाठी मुळीच नव्हे." (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, २००२) राष्ट्रसंतांना कर्तृत्ववान व संपन्न व्यक्तीमत्त्व असलेली स्त्री अपेक्षीत आहे. जेणेकरून ती कुटुंब व समाज जीवनाला सहायक ठरेल. संपन्न कुटुंब व समाजाद्वारेच बलवान भारताची निर्मिती होऊ शकेल.

## निष्कर्ष

1. विचारवंतांनी विविध ग्रंथात स्त्रीविषयी सकारात्मक दृष्टिकोनातून लेखन केलेले आहे.
2. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र ती शोषित म्हणून जीवन जगते.
3. व्यवहारात तिचे स्थान दुय्यम आहे.

4. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेत अत्यंत तर्कशुद्ध दृष्टिकोनातून आपले अभ्यासपूर्ण विचार व्यक्त केले आहेत.
5. त्यांच्या मते स्त्री ही पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. हे त्यांचे मत म. जोतिराव फुले यांच्या मताशी जुळतेमिळते आहे.
6. राष्ट्रसंतांच्या मते स्त्रीला कालोचित आणि परिस्थितीजन्य शिक्षण दिले जावे.
7. स्त्रीने कितीही प्रगती केली तरी आपली जबाबदारी संभाळावी असे राष्ट्रसंतांना वाटते. उदा. पाककला, बालसंगोपन इत्यादी.
8. स्त्रीच्या बौद्धिक शिक्षणाबरोबर क्रीडा व शारीरिक शिक्षणाकडेही राष्ट्रसंतांनी लक्ष वेधले आहे.
9. समर्थ व संपन्न व्यक्तिमत्त्व असलेली स्त्री कुटुंब, समाज व राष्ट्राला बलवान बनवू शकते.
10. स्त्री आणि पृरुष हे दोघेही एकमेकांशिवाय अपूर्ण आहेत.
11. उद्याचा बलवान भारत निर्माण करण्याइतकी तिची महत्ता आहे.

## समारोप

स्त्रियांच्या बाबतीत समाजव्यवस्थेत दुटप्पी भूमिका दिसून येते. ललित साहित्यात तिचे उदात्त चित्रण असून प्रत्यक्ष जीवन व्यवहारात याहून वेगळी स्थिती आहे. तिच्याकडे न्यूनत्वाच्या दृष्टीने पाहिले जाते. यात पुरुषांची स्वार्थी वृत्ती आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपला दृष्टिकोन स्पष्ट करताना विविध पौराणिक, ऐतिहासिक उदाहरणे उद्‌धृत करुन स्त्री महती पुरुषापेक्षा कशी अधिक आहे ते सप्रमाण सिद्‌ध करतात. बौद्‌धिक शिक्षणाच्या बरोबरीने स्त्रीला शारीरिक शिक्षण दिले जावे जेणेकरुन तिच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होऊन ती सर्वार्थाने स्वावलंबी, समर्थ नि संपन्न जीवन जगू शकेल असे ते विचारपूर्वक लिहितात. राष्ट्रसंत असेही म्हणतात, तिला राणी मानू नका किंवा दासी मानू नका, समपातळीवरील मैत्रीचे नाते ठेवा. राष्ट्रसंतांचे ग्रामगीतेतील स्त्री चित्रण विज्ञानाधिष्ठित नि तर्कशुद्‌ध विचाराचा निर्भय व मुक्त आविष्कार आहे. राष्ट्रसंतांचे प्रस्तुत विचार येथील समाजव्यवस्थेने शिरोधार्य मानले तर निश्चितच स्त्रियांच्या जीवनातील आकित संपून तिला उर्जितावस्था प्राप्त होईल. माणूस म्हणून जगता येईल.

## संदर्भ सूची

**डॉ. सुहास पळशीकर (१९९९).** Research Journal Chief Editor – Prin.Dr. P.R. Mane, executie Editor Prin.M.A.Shaikh, a Publication of the Karmaveer Academy of Education, Rayat Shikshan Sanstha, Satara, page No.64.

**छाया मोहनराव गडगे (२००६).** शोध यात्रा, दुसरा खंड, संपा.डॉ.सुनिता धर्मराव, लोकविद्या प्रकाशन, परभणी, प्र.आ. पृ.१२३.

**डॉ.सुभाष सावरकर (२००४).** ग्रामगीता रहस्य, स्पंद १, प्रकाशन – मराठी जनसाहित्य परिषद, अमरावती ५, प्र.आ. पृ.१०९.

**डॉ.उषा माधव देशमुख (२००८).** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - व्यक्ती आणि वाड़\मय, संपा. डॉ. अक्षयकुमार काळे, प्रका. विसा बुक्स, उत्तर अंबाझरी मार्ग, नागपूर, प्र.आ. पृ.७२.

**डॉ.भा.ल.भोळे (१९९०).** म. जोतीराव फुले; वारसा आणि वसा, साकेत प्रकाशन, औरंगाबद, प्र.आ. पृ.११४.

**राष्ट्रसंत तुकडोजी (२००१).** राष्ट्रसंतांची जपानमधली भाषणे, मराठी अनुवाद – प्रा. रघुनाथ कडवे, अमोल प्रकाशन, प्र.आ. पृ.११.

**राष्ट्रसंत तुकडोजी (२००९).** राष्ट्रसंत समग्र गद्य वाड़\मय, खंड ५वा, संपा. प्रा. रघुनाथ कडवे, श्री गुरूदेव प्रकाशन, प्र.आ. पृ.८०.

**डॉ. श्रीकांत तिडके (२००९).** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरवग्रंथ, संपा. प्राचार्य रा. तु. भगत, सहसंपादक डॉ. सुभाष सावरकर, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर, प्र.आ. पृ.१४८.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (२००२).** राष्ट्रसंत समग्र गद्य वाड्मय, संपा. प्रा. रघुनाथ कडवे, श्री गुरूदेव प्रकाशन, गुरूकुंज आश्रम, जि. अमरावती, प्र.आ. पृ.४२.